# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in distressed situation**

**Police Station** :- **Ansing**

**Date of Good Work done** :- **18/11/2021**

**Brief of the work done :-**

पोलिस स्टेशन अनसिग हद्दीतील ग्राम सापळी येथे बाल विवाह होत असले बाबत डायल 112 वर कॉल आल्याने त्वरित पोलिस घटनास्थळी दाखल होऊन बाल विवाह प्रतिबंध अधिकारी यांना संपर्क करून पोलिस व ग्राम प्रशासन यांचे समन्वयाने अल्पवयीन मुलीचा विवाह थाबविण्यात यश आले आहे. अशा तातडीचे व संकटकाळी डायल 112 वर कॉल करणे बाबत मा पोलिस अधीक्षक श्री बच्चन सिंह (IPS) यांनी आवाहन केले

लोकमत

## अल्पवयीन बालिकेचा विवाह रोखला

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** गुप्त माहिती मिळताच घटनास्थळ गाठून महिला व बालविकास विभागाने वाशिम तालुक्यातील सापळी येथे होणारा बालविवाह रोखल्याची घटना १६ नोव्हेंबर रोजी घडली.

वाशिम तालुक्यातील अनसिंग पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सापळी येथे १६ नोव्हेंबर रोजी बालविवाह होत असल्याची माहिती ग्रामसेवक धम्मानंद भगत यांनी महिला व बालविकास अधिकारी अलोक अग्रहरी यांना भ्रमणध्वनीवर दिली. प्रसंगाचे गांभीर्य ओळखून अग्रहरी यांनी बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अन्य अधिकारी यांना तत्काळ घटनास्थळी जाऊन बालविवाह थांबविण्याचे आदेश दिले. हेल्पलाईन क्रमांक ११२ या टोल फ्री क्रमांकाच्या सेवेकडून बालविवाह होत असल्याची माहिती मिळाली आणि तत्काळ अनसिंग पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आशिष देशमुख व चमू यांच्यासह संबंधित सर्व यंत्रणांची चमूने सापळी येथील अल्पवयीन बालिका तसेच आई व मुलांकडील कुटुंबाला बालविवाह न करण्याबाबत व त्यांचे भविष्यातील होणारे दुष्परिणाम याबाबत समुपदेशन केले. त्यानुसार बालविवाह रोखण्यात आला.



### हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा

जिल्हयात काही ठिकाणी बालविवाह होत असल्याची माहिती हेल्पलाइन क्रमांकावर मिळाली होती. त्यानुसार यापूर्वीदेखील बालविवाह रोखले आहेत. बालविवाह होत असल्यास चाईल्ड लाईनच्या १०९८ व पोलीस हेल्पलाईन ११२ या टोलफ्री क्रमांकावर संपर्क साधून नागरीकांनी माहिती दयावी. असे आवाहन प्रभारी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अलोक अग्रहरी यांनी केले आहे.

Hello Washim
Page No. 3 Nov 18, 2021
Powered by: erelego.com